दै. गोदातीर दि. 24.01.25

# अवैध दारू विक्री करणारी टोळी हिमायतनगर पोलिसांच्या जाळ्यात; पाच जणांना अटक



नांदेड (प्रतिनिधी) – पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत हिमायतनगर पोलिसांनी आपल्या हद्दीमध्ये कारवाई करून अवैधरित्या देशी व विदेशी दारू विक्री करणाऱ्या टोळीला अटक केली आहे. त्यांच्याकडून तीस हजार रुपयांचा मुद्देमाल सोबतच दोन तलवार आणि एक खंजर असे घातक शस्त्र जप्त केले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक अमोल भगत यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २२ जानेवारी रोजी करण्यात आली.

हिमायतनगर तालुक्यातील खडकी बाजार येथे अवैध दारू विकणारी टोळी सक्रिय झाल्याची माहिती हिमायतनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल भगत यांना मिळाली. त्यांनी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराव धरणे, सहाय्यक पोलीस अधीक्षक (भोकर ) शफाकत आमना यांच्या आदेशावरून टीमसह त्यांनी खडकी बाजार तालुका हिमायतनगर येथे कारवाई केली. या कारवाईमध्ये ८ हजार ४७० रुपयांची देशी दारू, १५ हजार ८४० रुपयांची विदेशी दारू, १२ हजार १५० रुपये रोख तसेच दोन तलवार आणि एक खंजर असा मुद्देमाल जप्त केला.

यावेळी पोलिसांनी पाच जणांना अटक केली. तर दोन जण घटनास्थळावरून पसार झाले.

यावेळी पोलिसांनी अवैध दारू विक्री करणाऱ्या शेख जिलानी शेख बाबा (वय ५०), वसंत अमरसिंग राठोड (वय ४६), रोहित वसंत राठोड (वय २१), अक्षय लक्ष्मण राठोड (वय २३) आणि तानाजी सदाशिव सोळंकी (वय ४१) सर्व राहणार खडकी बाजार तालुका हिमायतनगर यांना वेगवेगळ्या ठिकाणावरून मुद्देमालासह अटक केली. पोलीस दिसताच मात्र राजू जयस्वाल आणि गजानन जाधव हे दोघेजण पसार झाले. त्या सर्वांविरुद्ध हिमायतनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.